# ‘प्रेरणा’दायी

डिस्लेक्सिया हा आजार असणाऱ्या मुलांच्या मेंदूच्या रचनेत बदल झालेला असतो. त्यामुळे मेंदू आणि शारीरिक सवयी यातील सुसंवाद अंशतः खंडित होतो. प्रत्येक शाळेत १५ टक्के मुलांना डिस्लेक्सिया होण्याची शक्यता असते. भारतात जवळजवळ तीस मिलियन मुलं या व्याधीने पीडित आहेत. पालक आणि शिक्षण हे या आजाराबाबत अनभिज्ञ असल्याने डिस्लेक्सिया झालेल्या मुलांची प्रगती खुंटत आहे. अशा मुलांच्या बाबतीत योग्य वेळी योग्य पद्धतीने मार्गदर्शन करण्यात आलं, तर तीच मुलं इतरांच्या तुलनेत मिरॅकल ठरू शकतात.

> **पाचवीत शिकणाऱ्या रोहनचा गणिताचा पेपर पाहून त्याचे आईवडील थक्क झाले. रोहनने पेपरात साधे बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार चुकवले होते. रोहनच्या बाबतीत काय चुकतंय, हे जाणून घेण्यासाठी त्याला सायकिआट्रिस्टकडे नेलं. तेव्हा समजलं, की रोहनला डिस्लेक्सिया आहे...**

थॉमस एडिसन, अलेक्झांडर बेल, टॉम क्रूज, आइनस्टाइन, विस्टर्न चर्चिल, लिओनार्दो द विंची, जॉर्ज बुश, विल्यम जेम्स इत्यादी ग्रेट मंडळी डिस्केक्सियाने पीडित होती. पण योग्य वेळी मार्गदर्शन लाभल्याने इतरांसाठी ही मंडळी आदर्श बनली.

डिस्लेक्सिया पीडित मुलांसाठी मंजुला श्रॉफ यांनी अहमदाबादमध्ये चांगली योजना राबवली आहे. त्यांनी अहमदाबादमधील दिल्ली पब्लिक स्कूलमध्ये प्रेरणा नावाने डिस्लेक्सिया झालेल्या विद्यार्थ्यांसाठी वर्ग सुरू केले आहेत. मंजूला श्रॉफ म्हणाल्या, ‘डिस्लेक्सिया झालेल्या मुलांसाठी मी रिसर्च करायला सुरुवात केली. माझ्या कामाची पद्धत पाहून विक्रम साराभाई यांनी दिल्ली पब्लिक स्कूलमध्ये काम करण्याची संधी दिली. डिस्लेक्सिया झालेल्या मुलांना आपण इतर मुलांपेक्षा वेगळे आहोत, आपल्यात काहीतरी कमतरता आहे, असा न्यूनगंड होऊ नये, म्हणून आम्ही त्याच शाळेत वेगळे वर्ग केले. शिक्षकांनाही यासाठी ट्रेनिंग दिलं.’



डिस्लेक्सिया असलेले विद्यार्थी ओळखण्यासाठी प्रथम न्युरोलॉजिकल स्कॅन काढला जातो. त्यानंतर मानशास्त्रज्ञ ५-६ तासांची तपासणी करतात. त्यांची बायोलॉजिकल, सायकॉलॉजिकल आणि एज्युकेशनल अशी वर्गवारी केली जाते. त्यानुसार प्रत्येक विद्यार्थ्यासाठी स्वतंत्र प्लॅन तयार केला जातो. योग्य मार्गदर्शन मिळाल्यावर मुलं आपली गुणवत्ता सिद्ध करू शकतात. किंबहुना इतर मुलांच्या तुलनेत अधिक यशस्वी आयुष्य जगतात. यातील प्रत्येक मुलामध्ये एखादं कौशल्य लपलेलं असतं.

हे सगळं मंजूला श्रॉफ यांच्यासाठी अत्यंत आव्हानात्मक होतं. नॉर्मल दिसणाऱ्या मुलांमध्येही अशी काही कमतरता असू शकते, हे पटवून देणं तितकंसं सोपं नव्हतं. या धडपडीचं श्रेय त्यांना मिळालं आहे. गुजराथमधल्या ऊर्जा मेलमध्ये ‘प्रेरणा’च्या ब्रह्मज्योत सिंगने हायड्रोजक फ्युएल प्रदर्शनासाठी ठेवलं होतं. स्पेनमधील तज्ज्ञ मंडळी पोल्युशन कमी करणारं हायड्रोजन फ्युएल बघून आश्चर्यचकित झाले. त्यांनी ब्रह्मज्योतला स्पेनमध्ये स्कॉलरशिप देऊ केली. त्याने बनवलेलं हायड्रोजन फ्युएल त्याच्याच नावाने बाजारात येणार आहे.

‘प्रेरणा’ सुरू करण्यामागे मंजुला श्रॉफ यांची धडपड यशस्वी झाली आहे, हे सांगण्यासाठी ब्रह्मज्योतचं उदाहरण बोलकं आहे. आता भारतात इतरही ‘प्रेरणा’सारख्या संस्था सुरू करण्याची त्यांची इच्छा आहे. एखादी शाळा आपणहून पुढाकार घेणार असेल, तर मंजुलाची मार्गदर्शन करायला तयारी आहे. डिस्लेस्किया झालेल्या मुलांना मदत करण्याची इच्छा असेल, तर पुढील फोन नंबरवर संपर्क साधा. ०२७१७-२३४८०८ (२ ते ६) इमेल mshroff@calorxmail.com

– कुमुद सरमोकदम

kumud211@indiatimes.com